# 43वा वार्षिक अहवाल

सन 2019-20




## सर्वसामान्यांची जिव्हाळ्याची बँक....

# साधना सहकारी बँक लि. हडपसर

## कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य


225/4, शिवम् कॉम्लेक्स, पुणे- सोलापूर रोड, हडपसर, पुणे- 411 028.

फोन : (020) 26990563, फॅक्स : (020) 26991414

www.sadhanabank.com

E-mail : info@sadhanabank.com

## आमची स्फूर्ति व श्रद्धास्थान



आदरणीय मा. खासदार व बँकेचे मार्गदर्शक

# श्रध्देय विठ्ठलरावजी तुपे पाटील

यांचे पवित्र स्मृतीस नम्र अभिवादन

भारताचे आशास्थान



## मा. ना. शरदचंद्रजी पवारसाहेब

अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस

## बँकेचे संस्थापक



# स्व. डॉ. सि. तु. तथा दादासाहेब गुजर

यांचे पवित्र स्मृतीस नम्र अभिवादन

# * आमची निष्ठा *



**स्व. सादबा सोनबा तुपे**
संस्थापक संचालक



**स्व. कल्याणराव गुजर**
माजी चेअरमन

# * सुकाणू समिती *



**मा. श्री. दिलीपआबा तुपे**
मा. अध्यक्ष स्थायी समिती, पुणे, म.न.पा.



**आमदार मा. श्री. चेतन विठ्ठलराव तुपे**
उपाध्यक्ष, रयत शिक्षण संस्था
शहराध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस पुणे

# * संचालक मंडळ *

(जुलै २०२० पासून)



**मा. श्री. अनिल तुपे**
चेअरमन



**मा. आबा उर्फ हनुमंत कापरे**
व्हा.चेअरमन



**मा. श्री. सुरेश घुले**
संचालक



**मा. श्री. चंद्रकांत कवडे**
संचालक



**मा. श्री. बबन मगर**
संचालक



**मा. श्री. रमेश घुले**
संचालक



**मा. श्री. प्रविण तुपे**
संचालक



**मा. श्री. दिनकर हरपळे**
संचालक



**मा. श्री. सुभाष का. काळभोर**
संचालक



**मा. डॉ. श्री. सिद्राम राऊत**
संचालक



**मा. श्री. सुभाष न. काळभोर**
संचालक



**मा. सौ. वंदना काळभोर**
संचालिका



**मा. श्री. बाळासो गुजर**
संचालक



**मा. श्री. बाळासाहेब कोळपे**
संचालक



**मा. श्री. राजेश कवडे**
संचालक



**मा. सौ. रोहिणी तुपे**
संचालिका



**मा. श्री. शंकर बडदे**
तज्ञ संचालक



**मा. श्री. योगेश भगत**
तज्ञ संचालक



**मा. श्री. भाऊ तुपे**
कार्यलक्षी संचालक



**श्री. शंकर घुले**
कार्यलक्षी संचालक



**श्री. चारुचंद्र सोहोनी**
मुख्य कार्यकारी अधिकारी



**श्री. संजय शेवकर**
सहा. महाव्यवस्थापक

# * संचालक मंडळ *

(जुलै २०२० पर्यंत)



मा. श्री. चंद्रकांत कवडे
चेअरमन



मा. डॉ. श्री. सिद्राम राऊत
व्हा.चेअरमन



मा. श्री. सुरेश घुले
संचालक



मा. श्री. अनिल तुपे
संचालक



मा. श्री. बबन मगर
संचालक



मा. श्री. रमेश घुले
संचालक



मा. श्री. प्रविण तुपे
संचालक



मा. श्री. दिनकर हरपळे
संचालक



मा. श्री. सुभाष का. काळभोर
संचालक



मा. श्री. सुभाष न. काळभोर
संचालक



मा. सौ. वंदना काळभोर
संचालिका



मा. श्री. बाळासो गुजर
संचालक



मा. श्री. हनुमंत कापरे
संचालक



मा. श्री. बाळासाहेब कोळपे
संचालक



मा. श्री. राजेश कवडे
संचालक



मा. सौ. रोहिणी तुपे
संचालिका



मा. श्री. शंकर बडदे
तज्ञ संचालक



मा. श्री. योगेश भगत
तज्ञ संचालक



मा. श्री. भाऊ तुपे
कार्यलक्षी संचालक



श्री. शंकर घुले
कार्यलक्षी संचालक



श्री. संजय शेवकर
सहा. महाव्यवस्थापक




पुणे जिल्हा नागरी सह. बँक असोसिएशन पुणे आयोजित सायबर सुरक्षा व डिजीटलायजेशन व एनपीए या विषयांवर दि. २१/११/२०२० रोजी एक दिवसीय कार्यशाळा दिवे आगार येथे आयोजित केली होती. त्यावेळी उपस्थित बँकेचे संचालक मंडळ



बँकेच्या सन २०२१ सालासाठीच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करताना बँकेचे सुकाणू समिती सदस्य मा. आमदार चेतन तुपे-पाटील व मा. श्री. दिलीप आबा तुपे यांचे समवेत बँकेचे संचालक मंडळ



बँकेचे सुकाणू समिती सदस्य आमदार श्री. चेतन तुपे-पाटील यांची महाराष्ट्र राज्याच्या मराठी भाषा समिती अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल बँकेच्या वतीने त्यांचा सत्कार करताना सुकाणु समितीचे सदस्य व पुणे मनपा स्थायी समिती चे माजी अध्यक्ष श्री. दिलीप आबा तुपे याप्रसंगी चेअरमन श्री. अनिल तुपे व व्हा. चेअरमन श्री. आबा कापरे




साधना बँकेच्या हडपसर शाखेत एटीएम मध्ये रोख रक्कम भरणे तसेच रोख रक्कम काढणे असे एकत्रित काम करणाऱ्या रि-सायकलर एटीएम मशिनचे उद्‌घाटन करताना सुकाणू समिती सदस्य श्री. दिलीप आबा तुपे व आमदार श्री. चेतन तुपे-पाटील, चेअरमन श्री. अनिल तुपे, व्हा. चेअरमन श्री. आबा कापरे, संचालक मंडळ व इतर मान्यवर.




बँकेच्या मुख्य कार्यालयाच्या नियोजित इमारतीच्या पहिल्या स्लॅबचे पूजन करताना चेअरमन श्री. अनिल तुपे,
कार्यलक्षी संचालक भाऊ तुपे व इतर



महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासकीय अध्यक्ष मा. श्री. विद्याधरजी अनास्करसो यांनी बँकेला सदिच्छा भेट दिली असता बँकेचे चेअरमन श्री. अनिल तुपे यांचा सत्कार करताना समवेत संचालिका सौ. रोहिणीताई तुपे कार्यलक्षी संचालक भाऊ तुपे तसेच श्री. अनास्करसो यांनी यावेळी बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.



पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशन पुणे यांचे वतीने देण्यात येणारा उत्कृष्ट महिला संचालिका ''कै. मीराताई देशपांडे पुरस्कार'' यावर्षी बँकेच्या महिला संचालिका सौ. वंदनाताई काळभोर यांना प्राप्त झाला. सदर पुरस्कार स्वीकारताना सौ. वंदनाताई काळभोर, असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. सुभाष मोहिते, श्री. सुनिल रुकारी, श्री. अनिरुद्ध देशपांडे व असोसिएशनचे इतर संचालक व पदाधिकारी



साधना सहकारी बँकेचा शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसायासाठी कर्ज पुरवठा.
आळेफाटा येथील श्री गणेश सहकारी दुध उत्पादक संस्थेला बँकेचे चेअरमन श्री. अनिल तुपे, संचालक श्री. चंद्रकांत कवडे, संचालक श्री. सुभाष न. काळभोर यांनी भेट दिली.



शिरुर लोकसभा मतदार संघाचे खासदार मा. श्री. अमोलजी कोल्हे यांचा सत्कार करताना
चेअरमन श्री. अनिल तुपे, संचालक श्री. बाळासाहेब गुजर, जेष्ठ सभासद अब्दुलभाई सय्यद




सन २०२० मध्ये कोरोनाच्या वाढत्या प्रार्दुभावामुळे महाराष्ट्र शासनाने राज्यातील सहकारी संस्थांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीला सहकार्य करण्याचे आवाहन केले होते. त्यास प्रतिसाद देताना बँकेने मुख्यमंत्री सहाय्यता निधीला रु. ५ लाख व कामगारांचे एक दिवसाचे वेतन व संचालक मंडळ भत्ता रु. २ लाख २५ हजार असे एकूण रु. ७ लाख २५ हजार दिले. त्याप्रसंगी सहाय्यक आयुक्त श्री. अनिल कवडे यांचेकडे चेक सुपूर्त करताना बँकेचे तत्कालीन चेअरमन श्री. चंद्रकांत कवडे, तत्कालीन व्हा. चेअरमन डॉ. श्री. सिद्राम राऊत, श्री. सुभाष मोहिते, कार्यलक्षी संचालक भाऊ तुपे, सहाय्यक महा. व्यवस्थापक श्री. संजय शेवकर व इतर मान्यवर

# साधना सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.

(नोंदणी क्र. पीएनए/बीएनके/२४६ ता. १०/६/१९७५)
मुख्य कार्यालय : २२५/४, 'शिवम कॉम्प्लेक्स्', पुणे-सोलापूर रोड, हडपसर, पुणे - २८. ● फोन :(०२०) २६९९०५६३
● www.sadhanabank.com ● www.facebook.com/sadhanabank ● email : info@sadhanabank.com

## ४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

### (केवळ सभासदांकरिता)

**सभासदांना कळविण्यात येते की, कोविड-१९ च्या साथीच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या निर्देशांचे पालन करणेकरिता व महाराष्ट्र शासन सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचे दि. २५ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार बँकेची ४३ वी वार्षिक सर्व साधारण सभा बुधवार, दि. २४/०३/२०२१ रोजी सकाळी ९.३० वाजता, ऑनलाईन पद्धतीने खालील विषयांचा विचार करण्यासाठी आयोजित केली आहे. सदर सभा ऑनलाईन पद्धतीने होणार असल्याने सभासदांची प्रत्यक्ष उपस्थिती अपेक्षित नाही. त्यामुळे सदर सभा बँकेचे मुख्य कार्यालय, २२५/४, शिवम् कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, आकाशवाणी, हडपसर, पुणे-२८ येथे घेण्यात येईल. तरी या सभेस ऑनलाईन उपस्थित रहावे, ही विनंती.**

### * सभेपुढील विषय *

१. मागील दि. २१/०९/२०१९ रोजी झालेल्या ४२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२. मा. संचालक मंडळाच्या वर्ष २०१९-२० सालच्या बँकेच्या कामकाजाच्या अहवालावर चर्चा करणे व तो स्विकृत करणे.
३. वर्ष २०१९-२० सालच्या लेखा परिक्षण झालेल्या ताळेबंद व नफा तोटा पत्रकावर चर्चा करुन तो स्विकृत करणे.
४. वर्ष २०१९-२० सालच्या सनदी लेखा परिक्षकांच्या अहवालावर चर्चा करणे व तो स्विकृत करणे.
५. मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या वर्ष २०१९-२० सालच्या नफा वाटणीस मंजूरी देणे. तसेच महाराष्ट्र शासन अध्यादेश क्र. ४९ दि. ०२/११/२०२० अनुसार केलेल्या नफा वाटणीस कार्योत्तर मान्यता देणे.
६. वर्ष २०१८-१९ सालच्या आणि वर्ष २०१९-२० सालच्या वैधानिक/सनदी लेखा परिक्षण दोष दुरुस्ती अहवालावर चर्चा करुन तो स्विकृत करणे.
७. वर्ष २०२०-२१ साला करीता संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाज पत्रकाची आणि प्रगतीच्या तक्त्याची माहिती घेणे.
८. वर्ष २०२०-२१ सालासाठी म.शासन अध्यादेश क्र. ४९ दि. ०२/११/२०२० अनुसार केलेल्या वैधानिक/सनदी लेखा परिक्षकांच्या नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देणे.
९. वर्ष २०२०-२१ साला करिता अंतर्गत/अविरत (कंकरंट) लेखा परिक्षकांची नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देणे.
१०. मा. संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची माहिती घेणे.
११. वर्ष २०१९-२० या सालात देण्यात आलेल्या एकरकमी कर्ज परतफेड योजनेअंतर्गत देण्यात आलेल्या सवलतीची माहिती घेणे व मंजुरी देणे.
१२. रिझर्व्ह बँकेने सुचित केल्याप्रमाणे तसेच अन्य पोटनियम दुरुस्तीस मंजूरी देणे.
१३. बँकेने नेमणूक केलेल्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देणे.
१४. सदर वार्षिक सर्वसाधारण सभेस ऑडिओ व्हिज्युअल मिन्स **(Other Audio Visual Means)** द्वारे उपस्थित राहू न शकलेल्या सभासदांची रजा क्षमापित करणे.
१५. मा. सभासदांकडून आलेल्या लेखी सुचनांवर विचार व चर्चा करणे.
१६. मा. अध्यक्षांचे परवानगीने ऐनवेळच्या विषयावर चर्चा करणे.

**मा. संचालक मंडळाचे आज्ञेवरुन**

**दि. ०१/०३/२०२१**
**हडपसर, पुणे ४११ ०२८**

**चारुचंद्र रा. सोहोनी**
**महाव्यवस्थापक/मुख्य कार्यकारी अधिकारी**

---

*** टीप :**
गणसंख्ये अभावी ही सभा तहकूब करावी लागल्यास ती त्याच दिवशी ऑनलाईन पद्धतीने सकाळी १०.०० वा. सुरु होईल. या सभेस गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.

*** सुचना :**
१) जे सभासद आपला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक दि.१८/०३/२०२१ पर्यंत नोंदणी करतील. त्यांना लॉगिन आयडी आणि पासवर्ड दि. २०/०३/२०२१ रोजी एसएमएस द्वारे व ईमेल आयडीवर पाठविण्यात येतील व असेच सभासद वार्षिक सभेस उपस्थित राहू शकतील.
२) महाराष्ट्र शासन सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचे दि. २५ फेब्रुवारी २०२१ परिपत्रकात, ऑनलाईन पद्धतीने वार्षिक सर्व साधारण सभेच्या आयोजनासाठी, तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ञ संस्थेची सेवा घेण्याची सूचना केली आहे. त्या अनुषंगाने, बँकेने नॅशनल सिक्युरिटी डिपॉझिटरी लिमिटेड (NSDL) यांची वार्षिक सर्व साधारण सभेच्या आयोजनासाठी व वार्षिक सर्व साधारण सभेत मांडण्यात येणाऱ्या ठरावांवर ऑनलाईन पद्धतीने मतनोंदणीचे आयोजन करण्यासाठी नेमणूक केली आहे. काही अनपेक्षित परिस्थितीत उदा. तांत्रिक कारणांमुळे सदर वार्षिक सर्व साधारण सभेचे कामकाज खंडीत झाल्यास, तांत्रित तुटीचे निवारण झाल्यानंतर त्याच लिंकवर लगेचच सभेचे कामकाज पुढे सुरु केले जाईल. याची सभासदांनी कृपया नोंद घ्यावी.
३) सभासदांना लॉगिनबाबत काही तांत्रिक अडचणी आल्यास evoting@nsdl.co.in या मेल आयडीवर अथवा १८००१०२०९९०/१८००२२४४३० या दूरध्वनी क्रमांकावर स. ९.०० वाजल्यापासून सभा संपेपर्यंत संपर्क साधावा. त्यांचेकडून लॉगिन अथवा पासवर्ड बाबत काही प्रश्न/अडचणी असतील, तरच त्या सोडविल्या जातील. तसेच सभासदांना बँकेसंदर्भात अथवा विषयपत्रिकेबाबत प्रश्न असतील तर त्याचे निराकरण या एजन्सी मार्फत दिलेल्या क्रमांकावर व मेल आयडी वर होणार नाही.
४) बँकेने या सभेसाठी पाठविलेल्या अधिकृत लिंकवर जे सभासद सभेस उपस्थित राहतील, त्यांची उपस्थिती गणसंख्या मोजताना त्यावेळी ग्राह्य धरली जाईल.
५) वर्ष २०१९-२० चा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रक बँकेच्या वेबसाईट www.sadhanabank.com वर प्रसिद्ध करण्यात आला आहे.
६) सभेच्यावेळी विषयपत्रिकेतील बाबींसंबंधी विचारावयाची माहिती दि. १८/०३/२०२१ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत बँकेच्या प्रशासन विभागाकडे पत्ररुपाने विचारल्यास अथवा केवळ agm43@sadhanabank.com या ईमेल आयडीवर पाठविल्यास सदर माहिती सभेच्या दिवशी सादर करणे सोयीचे होईल.
७) भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सूचनेनुसार, सर्व सभासदांनी व खातेदारांनी के.वाय.सी. (KYC) बाबतच्या कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे. के.वाय.सी. पूर्तता झाली नसल्यास आपल्या शाखेस संपर्क साधावा.

## दि. 1 एप्रिल 2019 ते दि. 31 मार्च 2020 या आर्थिक वर्षाचा अहवाल

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,

सप्रेम नमस्कार,

आपल्या बँकेच्या ३१ मार्च २०२० रोजीची आर्थिक स्थिती दर्शविणारा लेखापरिक्षकांची टिपण्णी समाविष्ट असणारा ४३ वा वार्षिक अहवाल आपणासमोर सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. प्रारंभी आपण सर्वांनी आमच्यावर सातत्यपूर्ण विश्वास दर्शविला व आम्हास संपूर्ण सहकार्य दिल्याबद्दल, मी, आपल्या सर्वांचे संचालक मंडळाच्या वतीने आभार मानतो. आपल्या सहकार्यावरच सर्वोत्कृष्ट कामगिरी करण्याकडे बँकेची वाटचाल सुरु आहे. बँकेच्या धोरणांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी तसेच प्रशासकीय दृष्ट्या सर्व निर्णयांची कार्यवाही तत्परतेने व्हावी, यासाठी आपले संचालक मंडळ नेहमीच जागरुक असते.

वर्ष २०१९-२० मध्ये जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये एकूणच चढ उतार दिसून आले. जागतिक मंदीमुळे उत्पादनामध्ये घट, निर्यातीत घट, परकीय चलन व जी.डी.पी. मध्ये झालेली घसरण या व इतर कारणांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम, यामुळे बँकिंग क्षेत्रालाही विविध संकटाना तोंड द्यावे लागले. त्यातही सहकारी बँक क्षेत्राला मिळणाऱ्या दुय्यम दर्जाच्या वागणुकीमुळे सहकारी बँकांची स्थिती अडचणीची झाली. आर्थिक वर्ष अखेरीस भारतात प्रवेश केलेल्या कोरोना महामारीचा भयंकर परिणाम अर्थव्यवस्थेवर झाला असून, त्यानंतरच्या आर्थिक वर्षात लॉकडाऊन मुळे बंद पडलेले अनेक व्यवहार, अनलॉक ५ नंतरही पूर्णपणे सुरु झालेले नाहीत. सध्याची आर्थिक स्थिती ही बँकिंग सेवांचा व मुख्यत: सहकारी बँकांचा कसोटीचा काळ आहे. अशा परिस्थितीमध्ये देखील योग्य व त्वरित निर्णय घेण्याची तत्परता संचालक मंडळ दाखवत असून, उद्योग धंद्यावर परिणाम झालेल्या कर्जदारांची कर्जे RBI धोरणानुसार पुर्नगठित करणे, त्यांची मुदत वाढविणे व आवश्यकते नुसार नवीन कर्जपुरवठा करणेबाबत संचालक मंडळ निर्णय घेत आहे. कोरोना विषाणूच्या नियंत्रणानंतर, औद्योगिक व सेवा क्षेत्रातील मंदी कमी होण्यास मदत होईल अशी अपेक्षा आहे.

या सर्व आर्थिक घडामोडी चालू असताना सामाजिक बांधिलकी देखील बँकेने जपलेली आहे. कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर, मुख्यमंत्री सहायता निधीस कामगारांचे एक दिवसाचे वेतन व संचालक मंडळ भत्ता मिळून रुपये सात लाख पंचवीस हजार रक्कम आपण मदत म्हणून दिली आहे व सामाजिक कार्यामध्ये आपला खारीचा वाटा उचलला आहे.

आगामी २०२०-२१ वर्षा मध्ये बँकेकडून ग्राहक/सभासदांना आधुनिक बँकींग सुविधा उपलब्ध करुन देणेकरिता google Pay/Bhim/UPI app/Phone Pay या सर्व सेवा कार्यान्वीत होणार आहेत. आधुनिक बँकींगच्या दिशेने टाकलेले हे एक महत्वाचे पाऊल आहे.

दिवसेंदिवस आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात Cyber गुन्हांचे प्रमाणही वाढलेले आहे. त्यामुळे बँकेस तोषिस लागू नये म्हणून बँकेने सायबर लायबिलीटी इन्शुरन्स पॉलिसी रु. ५ कोटी इतकी स्विकारली आहे.

सायबर हल्ला होवू नये याकरिता बँकेने Cyber Security operation centre (CSOC) हे नामांकित कंपनीकडे Monitoring चे काम दिलेले आहे.

बँकेकडे असलेले सर्व ATM, RBI च्या धोरणानुसार EMV Complied असून, सर्व ग्राहकांना दिलेली कार्डस् ही EMV Chip Base आहेत. तरी ग्राहकांना नम्र विनंती की आपले मोबाईल ॲप/ATM कार्ड वापरताना पूर्ण काळजी घ्यावी.

बँकेने सध्या हडपसर शाखेत ग्राहकांच्या सोयीकरिता खात्यात कधी ही पैसे भरणा करणे तसेच काढणे करिता रिसायकलर मशीन बसविले आहे.

केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सुचनेनुसार आपल्या बँकेने दि. २९/०२/२०२० रोजी कर्जखाते नियमित असणाऱ्या खातेदारांना रु. ३३ लाख इतके सानुग्रह अनुदान देवून सदरची रक्कम कर्जदारांच्या खात्यात जमा केली आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये २०२१ मध्ये सुधारणा होईल असे सांगितले जात आहे. Assocham चे अहवालानुसार इंडियन इकॉनॉमीमध्ये V Shape सुधारणा होत आहे. या संघटनेच्या अहवालानुसार आर्थिक क्षेत्रातील सुधारणा आणि उत्पादन व निर्यात यावर दिलेला भर, यामुळे आर्थिक सुधारणा लवकरच पहावयास मिळतील अशी आशा आहे. त्याशिवाय कोरोना व्हॅक्सीनेशन प्रोग्राम सुरु होण्यामुळे आरोग्यविषयक प्रश्न सुटण्यास मदत होत आहे.

केंद्र सरकारने येत्या पाच वर्षाच्या अवधीमध्ये आपली अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलर्स इतकी व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. तर मा. पंतप्रधानांनी 'आत्मनिर्भर भारत' अशी घोषणा केली आहे. त्यामुळे पायाभूत सुविधांवर भर दिला जाईल व एकूणच भारतीय अर्थव्यवस्थेला संजीवनी मिळेल अशी अपेक्षा आहे. त्याचा परिणाम बँकिंग उद्योगावर निश्चितपणे होईल व सहकारी

बँका देखील अडचणीतून बाहेर येतील अशी आशा वाटते

**आपल्या बँकेने सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये केलेली कामगिरी थोडक्यात :-**

१) बँकेचे वसूल भाग भांडवल रु. १७.९० कोटी इतके असून चालू आर्थिक वर्षात त्यात २४.५० लाख वाढ झालेली आहे.

२) आर्थिक वर्षामध्ये बँकेच्या व्यवसायामध्ये रु. ४१.९७ कोटीने वाढ होऊन एकूण व्यवसाय रु. ७५८.०१ कोटी इतका झाला आहे.

३) आर्थिक वर्षामध्ये बँकेच्या ठेवीमध्ये रु. ३२.५८ कोटी इतकी वाढ होऊन एकूण ठेवी रु. ४६०.२७ कोटी झालेल्या आहेत.

४) मार्च २०२० अखेर बँकेच्या कर्जामध्ये रु. ९ कोटी ४० लाख वाढ होऊन एकूण कर्ज येणेबाकी रु. २९७.७४ कोटी इतकी झालेली आहे.

५) बँकेचा राखीव निधी रु. ६०.७६ कोटी वरुन रु. ६७.७८ कोटी वर गेला आहे. ही वाढ रु. ७.०२ कोटी इतकी आहे.

६) बँकेस मार्च 2020 अखेर रु. ५.९२ कोटी इतका नफा झालेला आहे.

### निवड / अभिनंदन :

बँकेचे सुकाणू समिती सदस्य मा. आमदार श्री. चेतन तुपे यांची महाराष्ट्र राज्य मराठी भाषा समिती अध्यक्षपदी निवड झाली. त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन...!

बँकेचे संचालक श्री. दिनकर सहादू हरपळे यांची हवेली तालुका पंचायत समिती उपसभापतीपदी निवड झाली, त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन...!

पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असो. पुणे, यांच्या तर्फे उत्कृष्ट महिला संचालिका पुरस्कारपदी बँकेच्या संचालिका सौ. वंदनाताई काळभोर यांची निवड झाली, त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन...!

### ऋणानिर्देश व आभार :

बँकेचे जेष्ठ सभासद व मार्गदर्शक आणि अखिल भारतीय गोवा स्वतंत्र संग्राम समितीचे अध्यक्ष स्व. रामभाऊ तुपे (माजी आमदार) यांची प्रेरणा व मार्गदर्शन, मा. खासदार स्व. विठ्ठलराव तुपे, बँकेचे संस्थापक स्व. डॉ. सि. तु. तथा दादासाहेब गुजर आणि तसेच सुकाणु समितीचे सदस्य स्व. सादबा दादा तुपे व बँकेचे जेष्ठ सभासद व माजी चेअरमन स्व. श्री. कल्याणराव गुजर आणि माजी चेअरमन स्व. रामचंद्र कवडे यांची कार्यपध्दती आणि मार्गदर्शन हे बँकेच्या वाढीस निश्चितच मोलाचे ठरले असून, त्या आधारे बँकेचे कामकाज गतिमान करणेचा आमचा प्रयत्न आहे. त्याबद्दल आम्ही त्यांचे निश्चितच ऋणी आहोत. या सर्वांचे आशिर्वाद व सभासदांचे योगदानामुळे बँकेच्या छोट्याशा रोपट्याचे आज वटवृक्षात रुपांतर झाले आहे. बँकेच्या सुकाणू समितीचे सदस्य व मा. अध्यक्ष स्थायी समिती पुणे श्री. दिलीपआबा तुपे तसेच आमदार मा. श्री. चेतन विठ्ठलराव तुपे यांनी बँकेच्या कामकाजात आवर्जुन लक्ष घालून संचालक मंडळास वेळोवेळी मार्गदर्शन केले याबद्दल त्यांचेही मन:पूर्वक आभार व धन्यवाद !

रिझर्व बँक ऑफ इंडियाचे वेगवेगळ्या विभागातील अधिकारी हे बँकेस वेळोवेळी मार्गदर्शन करीत असतात. याबद्दल त्यांचेही मन:पूर्वक आभार मानतो.

मा. सहकार आयुक्त व निबंधक श्री. अनिल कवडे, अप्पर निबंधक श्री. सुधीर तुंगार, विभागीय सह. निबंधक सौ. संगिता डोंगरे, उपनिबंधक श्री. आनंद कटके तसेच श्री. हिरे साहेब आणि सहकार खाते व सहकार निवडणुक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य येथील सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी बँकेस वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य केले त्याबद्दल त्यांचेही मन:पूर्वक आभार व धन्यवाद !

बँक कर्मचारी संघाचे जनरल सेक्रेटरी मा. श्री. विद्याधर अनास्कर यांनी बँकेस विविध प्रसंगी मार्गदर्शन केले याबद्दल बँक त्यांची आभारी आहे.

### * श्रध्दांजली :

अहवाल सालात, बँकेचे मार्गदर्शक मा. खासदार स्व. विठ्ठलराव तुपे यांच्य स्नुषा व अनिरुद्ध तुपे यांच्या पत्नी कै. मृण्मयी तुपे, श्री. दिलीप आबा तुपे यांच्या मातोश्री कै. इंदुबाई बाबुराव तुपे, भगिनी निवेदिता बँकेच्या संचालिका कै. मिराताई देशपांडे, तसेच बँकेचे सेवक कै. रविंद्र उत्तम तुपे, बँकेचे सभासद कै. रामचंद्र ज्ञानोबा हरपळे, कै. भगवानराव तरवडे, कै. रामचंद्र बबन माथफोड, कै. विमल काळे, कै. वनिता सुहास तुपे, कै. रत्नप्रभा ज्ञानोबा तावरे, कै. अंजनाबाई गुलाबराव मगर, कै. पार्वतीबाई मारुतराव काळे तसेच विविध क्षेत्रातील अनेक ज्ञात-अज्ञात सभासद, हितचिंतक, ग्राहक, कार्यकर्ते आणि समाजधुरीण यांचे निधन झाले आहे, या सर्वांना बँकेतर्फे भावपूर्ण श्रध्दांजली....!